# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED & MULTILINGUAL STUDIES

UGC Approved Research Journal (Sr. 47674)

Volume IV
Issue XII

ISSN : 2394-207X (Print)
IMPACT FACTOR : 4.205

December 2017


A Galaxy of Scholarly Written Research Papers/Articles

IJMMS

Cosmos


Chief Editor
Dr. V. H. Mane

Executive Editor
Prof. M. P. Shaikh



www.ijmms.in | Email : ijmms14@gmail.com



Scanned with OKEN Scanner

TITLE: INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

UGC Approved Research Journal (Sr. 47674)

Editors: Dr. V.H. Mane, Prof. M. P. Shaikh

Language: Multilingual

Published by

INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

Sneh Apartment,
Flat No. 001, Samarth Nagar, New Sangvi,
Pune- 411027

Copyrights: Editors 2014

All rights reserved

ISSN: 2394-207X (Print)
IMPACT FACTOR: 4.205

VOLUME-IV, ISSUE-XII

December -2017

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ | कृषी, आपत्ती व्यवस्थापन व औद्योगिकरणाचा पाया भक्कम करणारा नेता मा. शरदचंद्र पवार | डॉ. रमेश एस. देसाई | १५४-१५७ |
| ३७ | शरद पवारांनी कृषी क्षेत्रासंबंधी केलेले प्रयोग | डॉ. विलास पाटील | १५८-१६१ |
| ३८ | 'अँड-राम कांडगे लिखित' लोकनेते शरदरावजी पवार या ग्रंथाचे एक अवलोकन आणि आकलन | संतोष पद्माकर पवार | १६२-१६४ |
| ३९ | राजकीय क्षेत्रातील शरद पवारांचे योगदान | प्रा. सतीश उढाण | १६५-१६७ |
| ४० | आदरणीय शरदचंद्र पवारांचे सहकारातील योगदान | प्रा. शरदकुमार उत्तम शेटे | १६८-१७२ |
| ४१ | प्रभावी व अनुभवी नेतृत्व: शरद पवार | प्रा. ओंकार नरेंद्र केने | १७३-१७५ |
| ४२ | महिला सबलीकरणामध्ये शरद पवार यांचे योगदान | प्रा. ज्ञानेश्वर खोडवे | १७६-१७९ |
| ४३ | शरदचंद्र पवार यांचे कृषिक्षेत्रातील योगदान | प्रा. लोहगावकर जयश्री | १८०-१८४ |
| ४४ | आधुनिक भारताच्या विकासात शरदपवार यांचे योगदान: विशेष संदर्भ महाराष्ट्राच्या राजकारणाची अभिजन चौकट | राजकुमार सुरवसे | १८५-१८६ |
| ४५ | सकलजनवादी नेतृत्व शरद पवार | वैशाली प्रकाश पवार | १८७-१९१ |
| ४६ | पुलोद सरकार आणि शरद पवार यांची भूमिका | प्रा. सुपेकर वैशाली प्रशांत | १९२-१९४ |
| ४७ | मा. शरद पवार: व्यक्तिमत्त्व वैशिष्टये आणि नेतृत्व शैली | प्रा. सुनंदा हेळकर | १९५-१९७ |
| ४८ | शरद पवार यांची सामाजिक न्यायवादी भूमिका - विद्यापीठ नामांतर संदर्भात | डॉ. निशा सिताराम मोरे | १९८-२०२ |
| ४९ | कृतीशील व्यक्तिमत्व:शरदराव पवार साहेब | चंद्रकांत पांडूरंग सरगर | २०३-२०४ |
| ५० | बहुआयामी लोकनेता: शरद पवार | डॉ. मीना ठाकूर | २०५-२०६ |
| ५१ | शरद पवारांचे महिला सक्षमीकरणात योगदान | प्रा. राजकुमार बबन रिकामे | २०७-२१० |
| ५२ | महिला सक्षमीकरणास शरद पवारांचे योगदान | प्रा. माधुरी सावंत | २११-२१२ |
| ५३ | शरदचंद्र पवार यांचे महिला सबलीकरण धोरण | प्रा. भाऊसाहेब खंडु सांगळे | २१३-२१४ |





Scanned with OKEN Scanner

# 'ॲड- राम कांडगे लिखित' लोकनेते शरदरावजी पवार या ग्रंथाचे एक अवलोकन आणि आकलन

संतोष पद्माकर पवार
मराठी विभाग प्रमुख
अण्णासाहेब आवटे कॉलेज,
मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे

आदरणीय शरद पवार साहेबांच्या जीवनाकडे पाहिल्यास 'राष्ट्रीय चारित्र्य निर्मिती' हा शब्द डोळ्यांसमोर येतो. भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या दुसऱ्या पिढीतील राजकीय व्यक्तिमत्त्वात पवार साहेबांचे स्थान हे सर्वोच्च स्वरुपाचे आहे.

सामान्य शेतकरी कुटुंबाने प्राप्त केलेली राजकीय आणि सामाजिक प्रतिमा हा पवार साहेबांच्या चरित्राचा सारांश आहे. लोकशाही परंपरा आणि संसदीय राजकारण हे पवार साहेबांच्या अंगी अशा परिस्थितीत रुजले की त्याने भारतीय राजकारणाला एका सुज्ञ व्यक्तित्वाची ओळख झाली.

शेतकरी आणि कष्टकरी वर्गाच्या लढ्याची वास्तविकता आणि प्रश्नांची जाण हा पवार साहेबांच्या मूळ चिंतनाचा विषय आहे आणि त्यातूनच त्यांना संपूर्ण राजकीय आणि सामाजिक जीवनाची गुरुकिल्ली सापडली.

राजकीय जीवनाचे आवर्त हे बहुव्यामिश्र आणि गुंतागुंतीचे असते, विमानाच्या कॉकपिटमध्ये संपूर्ण प्रशिक्षित व्यक्तिलाच जसा प्रवेश असतो; तेथे येऱ्यागबाळ्याचे कोणतेही काम नसते, तद्वत राजकारणाचे सुकाणू हाती धरणाऱ्या व्यक्तीत्त्वाचे असते.

मा. पवार साहेबांनी वयाच्या अवघ्या अडतिसाव्या वर्षी राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी सांभाळली, ते भारतातील त्या काळातील सर्वांत तरुण मुख्यमंत्री ठरले, राज्यकारणाच्या केंद्रस्थानी त्यांनी पटकावलेले स्थान आज अखेर अबाधित आहे.

मा. पवार साहेबांचे प्रशंसक आणि टिकाकार हे त्यांच्या या पैलूवर एकमत दर्शवितात, पवार साहेबांची परिस्थिती हाताळण्याचे कौशल्य अफलातून आहे. जटिल प्रश्नांची सुबोध उत्तरे त्यांनी आपल्या कार्यकौशल्यातून समाजाला दाखवून दिली.

राजकीय आणिबाणीच्या प्रसंगातून केवळ स्वतः आणि आपला पक्ष यांचा विचार न करता संपूर्ण समाज आणि देशांचे हित पाहण्याचा दृष्टीकोन त्यांनी नव्याने राजकारणात रुजवला. सत्तेच्या केंद्रस्थानी असताना पवार साहेबांच्या व्यक्तिमत्वाला कायम वलय तर राहिलेच, पण विरोधी बाकावर बसलेल्या पवार साहेबांना तेवढाच मानमरातब मिळाला ;आणि त्यांच्या मार्गदर्शनाचे आकर्षण सर्वांना राहिले.

सहकार, शेती, पाणी, फळबाग, ऊस, कापूस, ग्रामीण विकास या प्रश्नातील तज्ज्ञ म्हणून त्यांच्याकडे पाहिले गेलेच, पण राजकीय धुरिणता, विचारसौष्ठव, पुरोगामी विचारांची पाठराखण आणि त्याप्रमाणे राजकीय निर्णय हे त्यांचे वैशिष्ट्य ठरले आहे.

राजकारणात पवार साहेबांपेक्षा जास्त काळ राहूनही कित्येक नेत्यांना त्यांच्या पक्षापलीकडे ओळख प्राप्त करता येऊ शकली नाही. पवारसाहेबांनी आपली छाप सर्व राजकीय पक्ष आणि समुहांवर कायम निर्माण करुन ठेवली आहे.

भारतीय राजकारणातील स्थित्यंतराचे एक अभ्यासक म्हणून पवार साहेबांकडे पाहिले जाते, जातिवंत शेतकऱ्यांच्या प्रतिनिधीने मिळविलेली ही गुणवत्ता आपल्या भूमीचे मार्दव स्पष्ट करणारी आहे.आपल्या आई कडून मिळालेला हा वारसा त्यांनी जोपासला आणि वाढवला.

'पात्यांची लवलव सांगे भूमीचे मार्दव'... या अर्थाने पवार साहेबांच्या एकूण कार्य-कर्तृत्वाकडे पाहावे लागते. राजकारण, समाजकारण, सहकार हे त्यांचे विषय त्यांची राजकारणावरील मांडणी घट्ट करणारे आहे. पाण्याचे योग्य नियोजन, शेतीतील आधुनिकता, शिक्षणाचा प्राध्यान्यकम एवढ्याच मुद्द्यांवर 'बारामती पॅटर्न' उभा राहिला आहे. सर्व राजकीय धुरिणांनी त्यांच्या बारामती पॅटर्न' ची प्रशंसा केली आहे. बारामती परिसराचा भौतिक विकास साधणारा पॅटर्न हा राजकारणातील देखील महत्त्वाचा ठरला आहे.